मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » सोमवार, दि.16 फेब्रुवारी 2026 | पान- 1

# चिंचवडमध्ये काँग्रेसविरोधात भाजपकडून 'जोडे मारो' आंदोलन

## काँग्रेसचे नेते हर्षवर्धन सपकाळ यांच्या हकालपट्टीची मागणी, भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या नेतृत्त्वात आंदोलन

**पिंपरी | प्रतिनिधी**

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि टिपू सुलतान यांची तुलना करून महाराष्ट्राच्या अस्मितेचा अपमान केल्याच्या निषेधार्थ आज भारतीय जनता पार्टी पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने पिंपरी चौकात आक्रमक आंदोलन करण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांनी सपकाळ यांच्या प्रतिमेला जोडे मारून आपला संताप व्यक्त केला आणि त्यांच्या हकालपट्टीची जोरदार मागणी केली.



शहराध्यक्ष शत्रुघ्न उर्फ बापू काटे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात आमदार उमा खापरे, संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, सरचिटणीस वैशाली खाडये, माजी नगरसेवक राजू दुर्गे, युवा मोर्चा अध्यक्ष दिनेश यादव आणि मंडलाध्यक्ष मंगेश धाडगे यांनी आपल्या भाषणातून सपकाळ यांच्या विधानाचा तीव्र निषेध केला.

"छत्रपती शिवराय हे आमचे आराध्य दैवत आहेत, त्यांची तुलना धर्मांध टिपू सुलतानशी करणे हे ऐतिहासिक अज्ञान असून असा अपमान महाराष्ट्र कधीही सहन करणार नाही.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा अवमान कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही. महाराष्ट्राच्या अस्मितेशी निगडित असलेल्या या विषयावर आम्ही ठाम आहोत. संबंधितांकडून तात्काळ माफी आणि योग्य ती कारवाई झाली नाही, तर जनतेच्या भावनांचा सन्मान राखण्यासाठी आम्ही लोकशाही मार्गाने अधिक तीव्र आंदोलन उभारू. शिवरायांचा सन्मान अबाधित ठेवणे हीच आमची भूमिका आणि बांधिलकी आहे," असा इशारा यावेळी वक्त्यांनी दिला.

याप्रसंगी हरीश मोरे,युवराज लांडे, देविदास साबळे, कैलास सानप,खंडूदेव काठारे,सतीश नागरगोजे, दिपक नागरगोजे,गणेश ढाकणे,देवदत्त लांडे, डॉ. हेमंत देवकुळे आणि हेमचंद्र मासुळकर यांचीही भाषणे झाली.

आंदोलनात या प्रसंगी विधान परिषद आमदार उमाताई खापरे, शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, दक्षिण भारत आघाडीचे प्रदेश संयोजक राजेश पिल्ले,सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे,जिल्हा सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, वैशाली खाड्ये, मधुकर बच्चे, नगरसेवक अनुराधा गोरखे, विजय उर्फ शीतल शिंदे, सागर गवळी, राजू मिसाळ, डॉ.सुहास कांबळे, कोषाध्यक्ष राजाभाऊ मासुळकर, प्रवक्ते कुणाल लांडगे, राजू दुर्गे, युवा मोर्चा अध्यक्ष दिनेश यादव, मंडल अध्यक्ष मंगेश धाडगे, मोहन राऊत, अनिता वाळूंजकर, अजित कुलथे, विजय शिनकर, मनोज ब्राह्मणकर, गणेश ढाकणे, देवदत्त लांडे, खंडू कठारे, कैलास सानप, मनीष पंजाबी, युवराज लांडे, सतपाल गोयल, देविदास साबळे, नंदू कदम, दीपक नागरगोजे, युवराज ढोरे, सतीश नागरगोजे, बिभीषण चौधरी, नेताजी शिंदे, हरीश मोरे, दिलीप गडदे, शिवदास हांडे, संतोष टोणगे, हेमंत देवकुळे, सचिन उदागे, रवींद्र सानप, रोहित मोखा, सुमित घाटे,राहुल खाडे, साची दोशी, प्रतीक रामगुडे, साईराज भालेकर, ऋषी भालेकर, गोपाल मंडल, दिनेश काटे, मनोज घोडेकर, अभिजित बागुल, आदम मुलाणी, अजय मोरे, उमेश सांडभोर, गौरव शिरुडे, प्रज्योतसिंग हंस, वैभव लंभाते, वरद अंबिके, सुधीर साळूंखे, मयुर काळभोर, जालिंदर काटे, विजय दळवी, ओमकार पवार,निखिल सहाने,संजय परळीकर तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बंजारा सेवा संघ मावळच्यावतीने संत सेवालाल जयंती उत्साहात साजरी

## संत गुरु सेवालाल महाराजांची जयंती पागडी रथयात्रा, भोग, प्रतिमा पूजन, सांस्कृतिक कार्यक्रम आदी उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली.

**पिंपरी | प्रतिनिधी**

बंजारा सेवा संघ मावळच्यावतीने संत गुरु सेवालाल महाराजांची जयंती पागडी रथयात्रा, भोग, प्रतिमा पूजन, सांस्कृतिक कार्यक्रम आदी उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. तळेगाव दाभाडे नगरपरिषदेतही संत सेवालाल महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



तळेगाव दाभाडे येथील सुशीला मंगल कार्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तत्पूर्वी, नगरपरिषद, जिजामाता चौक, मारुती मंदिर चौक ते सुशीला मंगल कार्यालया दरम्यान भव्य पागडी रथयात्रा काढण्यात आली. या रथयात्रेत मावळ तालुक्यातील बंजारा समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी आयोजित बंजारा समाज मेळाव्याचे उदघाट्न निवृत्त जिल्हा न्यायाधीश नामदेव चव्हाण यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगरसेवक सुधाकर शेळके होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्ष संतोष दाभाडे उपस्थित होते.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते राहुल खळदे, बंजारा सेवा संघ मावळचे संस्थापक अध्यक्ष हिरा रत्नू जाधव, अध्यक्ष महादेव राठोड, तळेगाव नगरपरिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी ममता चव्हाण – राठोड, सामाजिक कार्यकर्ते नितीन मुन्हे, ग्रामविकास अधिकारी परमेश्वर राठोड, वन अधिकारी ज्ञानेश्वर चव्हाण, डॉ. बी एस पवार, शंकर खेतावत, शोभा राठोड, विजयालक्ष्मी राठोड, जयश्री खेतावत, मीराबाई राठोड, लक्ष्मण नाईक, संस्थेचे उपाध्यक्ष चंदू राठोड, उपाध्यक्ष देसू राठोड, जयराम चव्हाण, शंकर पवार, खजिनदार राजू पवार, सचिव अतुल चव्हाण, विठ्ठल जाधव, विठ्ठल राठोड, यंका राठोड, शेट्टी चव्हाण, राम जाधव, आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना संतोष दाभाडे म्हणाले, की बंजारा समाज हा मेहनत करून जीवन जगणारा समाज आहे. मावळच्या जडणघडणीत या समाजाचे मोठे योगदान आहे. या समाजाला न्याय मिळावा. संस्कृती जपण्याचे काम या समाजाने केले. समाजाला जी मदत लागेल ती करू.

सुधाकर शेळके म्हणाले, की अनेकजण उच्चशिक्षित असून, मोठ्या अधिकारी पदावर कार्यरत आहेत. त्यांचे प्रश्न सोडविण्याला कायम प्राधान्य असणार आहे. नामदेव चव्हाण म्हणाले, की आपल्या समाजाची प्रगती व्हावी, म्हणून आपण सर्वांनी एकमेकांच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे. संत सेवालाल महाराजांच्या विचारातून प्रेरणा घ्यायला हवी. शिक्षण महत्त्वाचे आहे, त्यामुळे आपल्या मुलांना चांगले शिक्षण द्या. हिरा जाधव यांनी प्रास्ताविक केले. ते म्हणाले, की संत सेवालाल महाराजांच्या जयंतीदिनी शासकीय सुट्टी जाहीर करावी. सूत्रसंचालन महादेव राठोड यांनी, तर आभार लखन जाधव यांनी मानले.

# ‘नो पार्किंग’ फलक बेपत्ता, मात्र दंडात्मक कारवाईत ‘सुबत्ता’

## जाधववाडी परिसरातील गजबजलेल्या शिवरस्त्यावर ‘नो पार्किंग’चे फलक नसतानाही वाहने उचलून पोलिसांकडून दंड आकारला जात आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

जाधववाडी परिसरातील गजबजलेल्या शिवरस्त्यावर ‘नो पार्किंग’चे फलक नसतानाही वाहने उचलून पोलिसांकडून दंड आकारला जात आहे. कोणतीही पूर्वसूचना, रेखांकन, अधिकृत सूचना फलक नसताना अचानक कारवाई होत असल्यामुळे वाहनचालकांना नाहक आर्थिक फटका बसत आहे. त्यामुळे वाहनचालकांमध्ये नाराजी आणि चिंतेचे वातावरण असून पार्किंगसाठी पर्यायी व्यवस्थेची मागणीही त्यांनी केली आहे.

नागरिकांच्या माहितीनुसार, शिवरस्ता हा बाजारपेठ, शाळा, लहान-मोठी दुकाने आणि कार्यालयांनी व्यापलेला परिसर आहे. येथे दिवसभर मोठ्या प्रमाणावर वाहतूक असते. रस्त्याच्याकडेला जागा उपलब्ध असल्याने अनेक नागरिक आपली दुचाकी किंवा चारचाकी काही वेळेसाठी उभी करतात. मात्र, अलीकडच्या काही दिवसांत वाहतूक पोलिसांनी अचानक मोहीम राबवत अनेक वाहने क्रेनच्या साहाय्याने उचलून नेली. त्यानंतर संबंधित वाहनधारकांकडून दंड आकारण्यात आला.

रस्त्यावर कुठेही ‘नो पार्किंग’चा फलक नाही. पिवळ्या किंवा पांढऱ्या पट्ट्या नाहीत, कोणताही सूचना फलक नाही. तरीही आमची वाहने उचलली जात आहेत. हे अन्यायकारक आहे, असे वाहनधारकांचे म्हणणे आहे. काही नागरिकांनी तर दंडाची रक्कम भरताना नाराजी व्यक्त करत नियम स्पष्ट नसताना कारवाई कशी काय केली जाते ?, असा सवाल उपस्थित केला आहे. व्यापाऱ्यांनाही या कारवाईचा फटका बसत आहे. ग्राहकांना वाहन उभे करण्याची सोय नसेल, तर व्यवसायावर परिणाम होतो. प्रशासनाने आधी पर्यायी पार्किंगची व्यवस्था करावी आणि नंतरच कठोर कारवाई करावी, अशी मागणी व्यापारी करत आहेत.

दरम्यान, वाहतूक विभागाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, शिवरस्ता हा महत्त्वाचा मुख्य मार्ग असून अनियमित पार्किंगमुळे वाहतूक कोंडी वाढते. रुग्णवाहिका, अग्निशमन दलाची वाहने किंवा आपत्कालीन सेवा अडथळ्यात येऊ नयेत म्हणून कारवाई केली जात आहे. मात्र, स्पष्ट सूचना फलक नसल्याची बाब लक्षात घेता नागरिकांमध्ये गैरसमज निर्माण होत आहे.



### नागरिकांमध्ये गैरसमज

» वाहतूक विभागाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, शिवरस्ता हा महत्त्वाचा मुख्य मार्ग असून अनियमित पार्किंगमुळे वाहतूक कोंडी वाढते. रुग्णवाहिका, अग्निशमन दलाची वाहने किंवा आपत्कालीन सेवा अडथळ्यात येऊ नयेत म्हणून कारवाई केली जात आहे. मात्र, स्पष्ट सूचना फलक नसल्याची बाब लक्षात घेता नागरिकांमध्ये गैरसमज निर्माण होत आहे.

### नागरिकांच्या मागण्या

- » नो पार्किंग’ किंवा ‘पार्किंग’ क्षेत्र स्पष्ट करणारे फलक लावावेत
- » रस्ते योग्य चिन्हांकित करावीत, पार्किंगची पर्यायी व्यवस्था करावी
- » कारवाईपूर्वी जागृती मोहीम राबवावी, नागरिकांना नियमांची माहिती द्यावी
- » नियमांची पारदर्शक अंमलबजावणी व्हावी

**“ अनेकजण वाहने रस्त्याच्या कडेला उभी करून दुकानात जातात. त्यामुळे वाहतूक कोंडी होते. काही अपघात झाला; तर तेथून रुग्णवाहिकादेखील जाऊ शकत नाही. काही दिवसांपासून बऱ्याच नागरिकांनी आम्हाला याबाबत कारवाई करावी, अशी मागणीही केली होती. त्याचे समर्थनही काही जणांनी केले आहे. रस्त्यांवर ‘नो पार्किंग’चा फलक लावण्यात येईल. मात्र, नियम तोडल्यास कारवाई करण्यात येईल.**

**- रामचंद्र घाडगे, वाहतूक पोलिस निरीक्षक, तळवडे विभाग**

# तापमान अन् पाण्याच्या टँकरच्या मागणीतही वाढ

## गेल्या दिवसांपासून शहर परिसरात किमान व कमाल तापमानात वाढ झाली आहे

**पुणे | प्रतिनिधी**

गेल्या दिवसांपासून शहर परिसरात किमान व कमाल तापमानात वाढ झाली आहे. सकाळपासूनच उन्हाची तीव्रता जाणवत आहे. परिणामी, पाण्याची मागणी वाढली असून काही सोसायट्यांमध्ये टँकरच्या फेऱ्या वाढल्या आहेत. जलशुद्धीकरण केंद्रापासून लांबच्या व उंचावरील भागात कमी दाबाने व अपुरा पाणीपुरवठा होत आहे. पाणी साठवण्यासाठी ड्रम व टाक्यांची व्यवस्था नागरिकांना करावी लागत आहे.

सर्वांना समप्रमाणात, पुरेशा दाबाने आणि पुरेसे पाणी मिळावे, यासाठी महापालिकेकडून दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. निगडी प्राधिकरण सेक्टर २३ मधील जलशुद्धीकरण केंद्रातून निगडी, आकुर्डी, पिंपरी, चिंचवड, कासारवाडी, दापोडी, सांगवी, पिंपळे गुरव, पिंपळे सौदागर, रहाटणी, काळेवाडी, थेरगाव, वाकड, पिंपळे निलख, रावेत, ताथवडे, पुनावळे, किवळे, मामुर्डी, प्राधिकरण आदी भागांत; तर चिखली जलशुद्धीकरण केंद्रातून मोशी, चऱ्होली, दिघी, बोपखेल, प्राधिकरण सेक्टर एक ते १३, संतनगर, इंद्रायणीनगर या भागांत पाणीपुरवठा केला जात आहे. त्यासाठी अनुक्रमे पवना नदीवरील रावेत बंधारा आणि इंद्रायणी नदीवरील निघोजे बंधाऱ्यातून अशुद्ध जलउपसा केला जात आहे. त्यासाठी अनुक्रमे पवना व आंद्रा धरणातून नदीपात्रात विसर्ग केला जात आहे. पिंपरी चिंचवडप्रमाणेच नदी काठची गावे व नदीलगतच्या शेतीसाठीही जलउपसा केला जात आहे. मात्र, गेल्या काही दिवसांपासून उन्हाचा तडाखा वाढला आहे. नदीपात्रातील बाष्पीभवन वाढल्याने बंधाऱ्यातील पाणी पातळी अनेकदा खालावलेली असते. शिवाय, पाण्याची मागणीही वाढली आहे. त्याची पूर्तता करण्यासाठी गृहनिर्माण सोसायट्यांकडून टँकरच्या मागणीतही वाढ झाली आहे.



### महापालिकेचे नागरिकांना आवाहन

- » लोकसंख्या वाढीच्या तुलनेत पाण्याचा साठा व पुरवठा जैसे-थे असल्याने पाणी जपून वापरावे
- » वाहने धुण्यासाठी पिण्याचे पाणी वापरू नये
- » बाष्पीभवनाचे प्रमाण कमी होत तेव्हा अर्थात सायंकाळच्या वेळेस झाडांना पाणी द्यावे, ते पिण्याचे पाणी नसावे
- » नळ सुरू ठेवून भांडी किंवा कपडे धुवू नयेत
- » प्रत्येकाने दररोज ठरवले तर १० ते १५ टक्के पाणी वाचवणे शक्य आहे
- » भविष्यात पावसाळा लांबल्यास आता वाचवलेले पाणीच उपयुक्त ठरणार आहे

**“ पिंपरी चिंचवड शहरात राहण्यासाठी लोकांची पसंती आहे. त्यामुळे इमारतींची संख्या पर्यायाने लोकसंख्या वाढत आहे. त्यातुलनेत पाणी वाढत नाही. त्यामुळे नागरिकांनी पाणी जपून वापरावे. दिवसाआड पाणी मिळत असल्याने साठवून ठेवावे लागते. पाणी नळाला येते, तेव्हा आधीचे पाणी फेकून देऊ नये.**

**- अजय सूर्यवंशी, कार्यकारी अभियंता, महापालिका**

# विद्यापीठ चौकातील उड्डाणपूल तीन दिवसांत खुला

## 'कोणताही औपचारिक कार्यक्रम आयोजित न करता हा पूल वाहतुकीसाठी खुला करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत,': डॉ. योगेश म्हसे

**पुणे | प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौकातील उड्डाणपूल येत्या तीन दिवसांत सुरू झालेला दिसेल. त्याचे लोकार्पण मंगळवारपर्यंत होईल,' अशी माहिती पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (पीएमआरडीए) आयुक्त आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी शनिवारी सरहद संस्थेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात बोलताना दिली.

'कोणताही औपचारिक कार्यक्रम आयोजित न करता हा पूल वाहतुकीसाठी खुला करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत,' असे म्हसे यांनी सांगितले. हा उड्डाणपूल खुला झाल्यावर चौकातील कोंडी फुटण्यास मदत होणार आहे. पुणे महापालिका आणि पुणे महानगर विकास प्राधिकरणाच्या वतीने करण्यात येत असलेली अनेक विकास कामे निर्णायक टप्प्यावर आली असल्याचेही त्यांनी नमूद केले.

म्हसे म्हणाले, 'अतिशय गरीब वर्गासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून जवळपास दहा हजार घरे बांधण्यात आली आहेत. त्यातील चार हजार घरांचे वाटप करण्यात आले असून, साडेसहा हजार घरांच्या वाटपाचे काम अंतिम टप्प्यात आहे. मार्च महिन्यामध्ये ही सर्व कामे पूर्ण होतील.'

'पुण्याच्या भोवताली शहरीकरण वाढते आहे. एक लाखापासून पाच लाखापर्यंत लोकसंख्या असलेल्या शहरालगतच्या सुमारे ५७ गावांची निवड करून, तिथे मलनिस्सारणाची कामे करण्यात येणार आहेत. त्यासाठी 'अंडरग्राउंड ड्रेनेज सिस्टीम'चे काम हाती घेण्यात आले असून, सुमारे १२०० कोटी रुपयांचा हा प्रकल्प आहे. येत्या एक ते दोन महिन्यांत या कामांचा कार्यारंभ आदेश (वर्क ऑर्डर) जाहीर करण्यात येईल,' असेही त्यांनी नमूद केले.

'पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहराबरोबरच जिल्ह्यासाठी जीवनदायिनी असलेल्या इंद्रायणी, पवना आणि मुळा-मुठा या नद्यांची अवस्था सर्वांसमोर आहे. त्यांना नदी म्हणावे का, अशी परिस्थिती आहे. या तिन्ही नद्या प्रदूषणमुक्त करण्याचे काम हाती घेतले असून, त्यातील इंद्रायणी नदीसाठी सुमारे ७५० कोटी आणि पवना नदीसाठी २५० कोटी रुपयांची कंत्राटे काढण्यात आली आहेत. मुळा-मुठा नदीसाठी ९०० कोटी रुपयांचे कंत्राटासाठीची निविदा पुढच्या काही महिन्यांमध्ये प्रसिद्ध झाल्याचे दिसेल,' असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौकातील उड्डाणपूल येत्या तीन दिवसांत सुरू झालेला दिसेल. त्याचे लोकार्पण मंगळवारपर्यंत होईल,' अशी माहिती पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (पीएमआरडीए) आयुक्त आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी दिली.



### योगेश म्हसे म्हणाले...

- येत्या तीन वर्षांत पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरालगत सुमारे साडेसहाशे किलोमीटर लांबीचे काँक्रीट रस्ते.
- त्या रस्त्यांच्या देखभाल-दुरुस्तीची जबाबदारी १५ वर्षांसाठी पीएमआरडीएची.
- पीएमआरडीएचे संपूर्ण काम ऑनलाइन पद्धतीने
- प्रत्येक प्रकरण ब्लॉकचेनवर, तसेच निर्णयप्रक्रियेतही एआयचा वापर.
- सगळ्या कंत्राटांची छाननी 'एआय'च्या माध्यमातून
- प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रत्येक प्रकल्पाची सद्य:स्थिती, त्याची प्रगती आणि दररोजची स्थिती.

### अजित पवार यांचे स्मरण

'पीएमआरडीएच्या सर्व कामांमध्ये मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचे पाठबळ महत्त्वाचे आहे. दिवंगत अजितदादा पवार यांचे स्मरण करणे अत्यंत आवश्यक वाटते. प्रत्येक प्रकल्पाची ते पहाटे पाहणी करायचे. जिथे काही तरी चुकत असेल, त्या ठिकाणी दिशा देणे, मार्गदर्शन करणे, हा त्यांचा स्थायीभाव होता. त्यातून संपूर्ण प्रशासनाला आणि पुण्यातील विकासकामांना एक वेगळी दिशा मिळाल्याचे दिसते,' अशी भावना योगेश म्हसे यांनी व्यक्त केली.

### हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो दोन महिन्यांत

'हिंजवडीपासून शिवाजीनगरपर्यंतच्या मेट्रो प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात आहे. येत्या एक किंवा दोन महिन्यांमध्ये ही मेट्रो सुरू झालेली दिसेल,' असा विश्वास पुणे महानगर विकास प्राधिकरणाचे आयुक्त आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी व्यक्त केला.

# पुण्यात भाजपा-काँग्रेसचे कार्यकर्ते आमने-सामने; आंदोलनादरम्यान दगडफेक

## हर्षवर्धन सपकाळ यांच्या टिपू सुलतानवरील वक्तव्यावरुन भाजपा आणि काँग्रेसचे कार्यकर्ते आमने-सामने आल्याचं पाहायला मिळालं आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपू सुलतानची थेट छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबरोबर तुलना करणारे वक्तव्य केल्यानंतर राज्यात चांगलंच राजकारण तापलं आहे. हर्षवर्धन सपकाळ यांच्या वक्तव्यावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील हर्षवर्धन सपकाळ यांच्यावर जोरदार टीका केली.

दरम्यान, हर्षवर्धन सपकाळ यांच्या वक्तव्याचा निषेध करत भाजपाच्या कार्यकर्त्यांकडून आज राज्यभरात आंदोलन करण्यात येत आहे. पुण्यात भाजपाच्या कार्यकर्त्यांनी आज आंदोलन केलं. मात्र, यावेळी भाजपा आणि काँग्रेसचे कार्यकर्ते आमने-सामने आल्याने मोठ्या प्रमाणात तणाव निर्माण झाल्याचं पाहायला मिळालं.

भाजपाच्या कार्यकर्त्यांनी पुणे काँग्रेस भवनाच्या बाहेर आंदोलन करत जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी आंदोलनाला हिंसक वळण लागल्याचा आरोप करण्यात आला आहे. या आंदोलनावेळी दगडफेक आणि बाटल्या फेकल्याचा आरोप काँग्रेसने केला असून यामध्ये काही कारच्या काचा फुटल्या, तसेच गाड्यांचं मोठं नुकसान झालं आहे. तसेच काँग्रेसच्या एका कार्यकर्त्याला दगड लागल्याने तो रक्तबंबाळ झाल्याचीही माहिती समोर येत आहे.

दरम्यान, भाजपा आणि काँग्रेसचे कार्यकर्ते आमने-सामने आल्यामुळे पुण्यात काही वेळ मोठा गोंधळ आणि तणाव निर्माण झाला होता. मात्र, त्यानंतर पोलिसांनी परिस्थितीवर नियंत्रण मिळवलं असून आता तणावपूर्ण शांतता आहे. काँग्रेस भवनाच्या बाहेर मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आलेला आहे.

भाजपाच्या एका पदाधिकाऱ्याने माध्यमांशी बोलताना म्हटलं की, 'काँग्रेसकडून आधी दगडफेक करण्यात आली. काँग्रेसचे लोक आक्रमक होऊन आमच्या अंगावर येण्याचा प्रयत्न काँग्रेसच्या काही कार्यकर्त्यांनी केला', असा आरोप भाजाच्या पदाधिकाऱ्यांनी केला.




### हर्षवर्धन सपकाळ यांचं वक्तव्य

हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटलं की, "छत्रपती शिवाजी महाराजांनंतर त्यांच्या शौर्याप्रमाणेच, त्याच मांदियाळीत टिपू सुलतान आहेत. टिपू सुलतान यांनी इंग्रजांविरोधात लढा पुकारला होता. टिपू सुलतान हे शौर्य गाजवणारे एक योद्धे होते. ते भारताचे भूमिपूत्र होते. त्यांनी कधीही विषारी, विखारी विचारांना जवळ केलं नाही. ते एक शौर्याचं लक्षण म्हणून आपण टिपू सुलतान यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या समकक्ष बघितलं पाहिजे", असं हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटलं होतं.

# पीएमएफएमई योजनेतून पुणे जिल्ह्यात 250 प्रकल्प कार्यान्वित

## 46 कोटींची गुंतवणूक, सुमारे एक हजारांना रोजगार; अन्न प्रक्रिया उद्योगात हवेली तालुका आघाडीवर

**पुणे | प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या पंतप्रधान सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेअंतर्गत (पीएमएफएमई) यंदाच्या 2025-26 वर्षासाठी पुणे जिल्ह्याला 480 प्रकल्पांचे उद्दिष्ट देण्यात आले होते. त्यामध्ये दाखल परिपूर्ण 250 प्रस्तावांना मंजुरी देण्यात आल्यानंतर ते प्रत्यक्षात सुरूही झालेले आहेत. जिल्ह्यात या प्रकल्पांमधून सुमारे 46 कोटी रुपयांची भांडवली गुंतवणूक झालेली आहे. तसेच सुमारे एक हजार लोकांना नव्याने रोजगार मिळालेला आहे. सद्यस्थितीत विविध बँकांच्या स्तरावर 332 प्रस्ताव हे कर्ज मंजुरीच्या प्रतीक्षेत आहेत.

दरम्यान, या आर्थिक वर्षामध्ये विविध बँकांमार्फत एकूण 38 कोटी 39 लाख रुपयांइतके कर्ज संबंधित प्रकल्पांसाठी वितरित झाले आहे. तर पीएमएफएमई योजनेतून आत्तापर्यंत 13 कोटी 49 लाख रुपयांइतके अनुदान संबंधित प्रकल्पाच्या लाभार्थी शेतकऱ्यांना वितरित केल्याचे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयातून सांगण्यात आले.

केंद्र सरकारकडून अर्थसहाय्यीत पंतप्रधान सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना (पीएमएफएमई) सन 2020-21 पासून राज्यात राबविण्यात येत आहे. या योजनेतून कार्यरत प्रकल्पांचे विस्तारीकरण व नव्याने उभारणी होणाऱ्या पात्र प्रकल्पांना प्रकल्प किंमतीच्या 35 टक्के व कमाल रक्कम रुपये 10 लाखांइतके अनुदान वैयक्तिक लाभार्थ्यांना वितरीत करण्यात येते. यामध्ये लाभार्थी स्व-हिस्सा किमान 10 टक्के आहे. तसेच शेतकरी उत्पादक संस्था/ स्वयंसहाय्यता गट/ सहकारी उत्पादक यांना सामाईक पायाभूत सुविधा, शेतमालाचे उत्पादनापासून ते ग्राहकांकडे जोडणारा दुवा (फॉरवर्ड-बॅकवर्ड लिंकेज), भांडवली गुंतवणुकीकरता खर्चाच्या 35 टक्क्यांइतके अनुदान दिले जात आहे.

तसेच, मार्केटींग व ब्रँडिंग या घटकांतर्गत एकूण खर्चाच्या 50 टक्के अनुदान देय आहे. स्वयंसहाय्यता गटांना खेळते भांडवल, सदस्यांना कर्ज किंवा गुंतवणुकीकरीता (सीड कॅपिटल) प्रति बचत गटास रक्कम रुपये चार लाखांएवढा लाभ दिला जात आहे.

या योजनेअंतर्गत एका गटातील कमाल दहा सदस्यांना प्रत्येकी 40 हजार रुपयांइतके बीज भांडवल म्हणून देण्यात येतात. या योजनेंतर्गत अनुसूचित जाती, जमाती, महिला यांना प्राधान्य देण्यात येत आहे. लाभार्थ्यांना किमान शिक्षणाची अट रद्द करण्यात आलेली आहे. जिल्हास्तरीय प्रशिक्षण संस्थेमार्फत इच्छुक लाभार्थींना, कर्ज मंजूर झालेले लाभार्थी यांना प्रशिक्षण देण्यात येते.



### प्रकल्पात हवेली आघाडीवर; दुग्ध उद्योगाचे सर्वाधिक 39 प्रकल्प

**» जिल्ह्यात अन्न प्रक्रियेचे सर्वाधिक 67 प्रकल्प हे हवेली तालुक्यात आहे. शहराला लागून महत्वाचीआणि हक्काची बाजारपेठ असल्याने या तालुक्यात प्रकल्पांची संख्या अधिक असल्याचे दिसून येत आहे. तालुकानिहाय प्रकल्प संख्येमध्ये हवेली 67 सह दौंड 43, बारामती 28, जुन्नर 27, खेड 21, इंदापूर 16, शिरुर 14, आंबेगांव 11, मावळ 7, पुरंदर 7, भोर 5,मुळशी 4. दुग्ध प्रक्रिया उद्योग 39, मसाले पापड व लोणचे उद्योग 33, बेकरी उद्योग 23, गूळ उद्योग 18, पशुखाद्य व कोंबडी खाद्य उद्योग 26, फळे व भाज्या प्रक्रिया उद्योग 33, दाल मिल व राइस मिल आधारित उद्योग 24, तेलबियांवर आधारित उद्योग 10, नमकीन उद्योग (रेडी टू इट) 21, गहू आधारित उद्योग 10,मिलेटवर आधारित उद्योग 9,इतर उद्योग 4.**

### इच्छुकांनी करावेत संकेतस्थळावर अर्ज

**» पुणे जिल्ह्यात पीएमएफएमई योजनेअंतर्गत लाभ घेण्यास इच्छुक वैयक्तिक लाभार्थ्यांनी संकेतस्थळावर अर्ज सादर करावेत. तसेच, शेतकरी उत्पादक संस्था, स्वयंसहाय्यता गट, सहकारी उत्पादकांनी ऑफलाईन अर्ज कार्यालयात सादर करावेत.**

**“पुणे जिल्ह्यात पीएमएफएमई योजनेतून प्रामुख्याने दूध प्रक्रिया, मसाले व लोणची पापड, फळे व भाजीपाला प्रक्रिया, पशुखाद्य व कोंबडी खाद्य, बेकरी, दाल व राईस मिल, नमकीन उद्योग सुरु करण्यास शेतकऱ्यांकडून प्राधान्य दिले जात आहे. स्थानिक कच्च्या मालाच्या उपलब्धतेनुसार किफायतशीर व दीर्घकाळ सुरु राहील, असाच व्यवसाय प्राधान्याने निवडला जात आहे. केंद्र सरकारच्या या महत्वाकांक्षी योजनेमुळे ग्रामीण भागात रोजगार निर्मितीसही पाठबळ मिळाले आहे.**

**- संजय काचोळे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, पुणे**

# विलीनीकरणासाठी अजित पवार यांच्याशी मोजून 11 वेळा बैठका : जयंत पाटील

## ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी जयंत पाटील रात्री उशिरा पुण्यात आले होते.

**पुणे | प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणासाठी अजित पवार यांच्याशी मोजून ११ वेळा चर्चा व बैठका झाल्या होत्या. त्यांच्या पुढाकारानेच ही प्रक्रिया सुरू झाली होती. मात्र, आता परिस्थिती बदलली असून त्यावर भाष्य करणे योग्य नाही, असे स्पष्टीकरण राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी शनिवारी पुण्यात दिले.

ज्येष्ठ नेते शरद पवार यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. शनिवारी त्यांना डिस्चार्ज देण्यात आला. त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी जयंत पाटील रात्री उशिरा पुण्यात आले होते. भेटीनंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी विलीनीकरणाच्या चर्चाबाबत अधिक भाष्य करण्यास नकार दिला.

“विलीनीकरण व्हावे, अशी माझी इच्छा आहे. अजितदादादेखील सकारात्मक होते. आम्ही एकत्र आलो तर पक्ष अधिक जोमाने पुढे जाईल,” असे त्यांनी नमूद केले. मात्र, सध्याच्या घडीला या विषयावर अधिक चर्चा करणे योग्य नसल्याचे ते म्हणाले.

विलीनीकरणाबाबत राज्यातील प्रमुख नेते शशिकांत शिंदे आणि सुप्रिया सुळे निर्णय घेतील. त्यांनी घेतलेला निर्णय मान्य असेल आणि त्यानुसार पुढील पावले उचलली जातील, असेही पाटील यांनी स्पष्ट केले. पक्षाचे कामकाज सुरू असून त्याचे स्वतंत्र अस्तित्व कायम असल्याचे त्यांनी सांगितले.

“अजितदादा आज आमच्यासोबत नाहीत. त्यामुळे पुढे काय होईल, हे सांगता येत नाही. मात्र, महाराष्ट्रातील विविध प्रश्नांवर आमचा पक्ष काम करत राहील,” असे ते म्हणाले.

दरम्यान, त्यांनी सुनेत्रा पवार यांचीही भेट घेतली असून, कोणतीही अडचण आल्यास मदत करण्याचे आश्वासन दिल्याचे पाटील यांनी सांगितले. ज्येष्ठ नेते शरद पवार यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. शनिवारी त्यांना डिस्चार्ज देण्यात आला. त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी जयंत पाटील रात्री उशिरा पुण्यात आले होते.



### विलीनीकरणासाठी ११ बैठका

**» राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाच्या प्रक्रियेबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी एकूण ११ वेळा चर्चा व बैठका झाल्या होत्या, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी पुण्यात दिली. त्यांच्या पुढाकारानेच विलीनीकरणाची प्रक्रिया सुरू झाली होती. मात्र, सध्याच्या राजकीय परिस्थितीत या विषयावर अधिक भाष्य करणे योग्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.**